भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2018 ◐ UA 149623

-6 OCT 2018

अ. नं. 17016 दि ............ रु. 100/- पैकी रु. MOU

श्री. / श्रीमती / सौ. NAB युनिट महाराष्ट्र

पत्ता P-66 MIDC सातपुर नाशिक

हस्ते चंद्रकांत खोंडवे

सही

TREASURY OFFICE NASIK

-1 OCT 2018

STPHC ATO

श्री. सं. रा. अमृतकर
स्टॅम्प व्हेंडर, नाशिक.
(मु. वि. प. क्र. १०२/२००२)

## सामंजस्य करार

### विषय : ॲम्वे नॅब लायब्ररी केटीएचएम कॉलेज–नाशिक करार

लिहुन देणार : मा.प्राचार्य,
केटीएचएम कॉलेज–नाशिक

लिहुन घेणार : मा.अध्यक्ष,
नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड,युनिट महाराष्ट्र,नाशिक

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड, युनिट महाराष्ट्र, नाशिक आणि केटीएचएम कॉलेज,नाशिक हयांच्यात करार झाल्या अन्वये नाशिक येथे दृष्टीबाधितांसाठी ब्रेल लायब्ररी सुरु करण्याचे ठरले आहे.

केटीएचएम कॉलेज, नाशिक येथे दृष्टीबाधितांसाठी ब्रेल लायब्ररी सुरु करण्याच्या दृष्टीने केटीएचएम कॉलेजच्या ग्रंथालयाच्या इमारतीत एक कक्ष स्वतंत्रपणे विनामुल्य देण्याचे कॉलेज ने मान्य केले आहे. त्याप्रमाणे दृष्टीबाधितांच्या सर्वांगिण विकासाकरीता दोन्ही संस्थेनी पुढाकार घेवुन हा सामंजस्य करार केला आहे.

ब्रेल लायब्ररी साठी नॅब युनिट महाराष्ट्र खालील सुविधा लायब्ररीसाठी नॅब च्या मालकीच्या अधिन राहुन खालील सुविधा उपलब्ध करुन देत आहोत.

| क्र. | सामुग्रीचे नांव | एकुण परिमाण |
|---|---|---|
| ०१ | लोखंडी कपाट ६ फुटी | ०२ नग |
| ०२ | लायब्ररी चा नाम फलक 4' x 2' | ०१ नग |
| ०३ | ब्रेल लिपीतील वाचनालयासाठीची विविध लेखकांची पुस्तके. (यादी स्वतंत्रपणे देत आहे) | १०० पुस्तके |
| ०४ | पुस्तकांचे रेकॉर्डींग केलेल्या ऑडीओ सीडीज (यादी स्वतंत्रपणे देत आहे) | १०० नग |

ही सामुग्री उपलब्ध करुन दिली जाणार आहे. ती नॅब महाराष्ट्र च्या मालकीची राहणार आहे.

- संस्थेकडुन अपेक्षित सेवा :---

०१. संस्थेनी विनामुल्य जागा उपलब्ध करुन ही सामुग्री ठेवण्यास मान्यता दिली आहे.

०२. ग्रंथालय दृष्टीबाधितांना महाविद्यालयीन वेळेत वाचनासाठी उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे.

०३. ग्रंथालय व्यवस्थापन महाविद्यालय ग्रंथालय प्रमुख यांनी दृष्टीबाधितांना पुस्तके देवाण घेवाण करण्यासाठी सेवा म्हणुन सेवक उपलब्ध करुन देण्याचे मान्य केले आहे.

०४. ग्रंथालयात लाभार्थींचे रजिस्टर ठेवणे आवश्यक आहे.

०५. केटीएचएम कॉलेज चे नियुक्त केलेले प्रतिनिधी समन्वयासाठी तसेच लायब्ररीच्या विकासा साठी महाविद्यालयाचे ग्रंथालय प्रमुख यांचेशी समन्वयकाची भुमिका ठेवुन मदत करतील.

०६. दर तीन महिन्यांनी कामकाज अहवाल तयार करुन आढावा घेतला जाईल.

भविष्यात लायब्ररीचे दुसरीकडे स्थलांतर करावयाचे असल्यास तो हक्क नॅब युनिट महाराष्ट्रला राहील. तेव्हा उपलब्ध करुन दिलेल्या सर्व पुस्तकांसह सामुग्री ही नॅब युनिट महाराष्ट्र घेवुन जाईल. त्याला संस्थेची कोणतीही हरकत राहणार नाही. अथवा भविष्यात महाविद्यालयाला जी जागा लायब्ररीसाठी उपलब्ध करुन दिली ती खाली करुन घेण्याचा अधिकार राहील. पण त्यासाठी नॅब महाराष्ट्राला किमान ६ महीने अगोदरची पुर्वसुचना देण्याची कार्यवाही अपेक्षित राहील.

दोन्ही संस्थांचे प्रमुख दृष्टीबाधितांच्या हितासाठी व त्यांच्या वाचन संस्कृतीत वाढ होण्याच्या दृष्टीने समर्पित होत असल्याने हा सामंजस्य करार करीत असुन ब्रेल लायब्ररी दि. १५ ऑक्टोंबर २०१८ पासुन केटीएचएम कॉलेज ग्रंथालय इमारतीत प्रारंभ करण्यास हया करारान्वारे मान्यता देत आहोत.

HON. GENERAL SECRETARY
NAB UNIT MAHARASHTRA

नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड
युनिट महाराष्ट्र च्या वतीने

NATIONAL ASSOCIATION FOR THE BLIND * UNIT MAHARASHTRA * NASHIK

प्राचार्य
केटीएचएम कॉलेज,नाशिक

**Principal**
K. R. T. Arts, B. H. Commerce & A. M.
Science College, Nashik-422002

K. R. T. Arts, B. H. Commerce & A. M. Science College * Nashik 422002

Desk/sms-Apr.18-Mar.19/Amway Braille Library/Nashik-KTHM